अर्थसंकल्पीय अनुदान वर्ष २०१७-१८.
नगरपालिका व नगरपरिषदांच्या पाणी पुरवठा
व जलनि:स्सारण योजनांसाठी
सहाय्यक अनुदान.
लेखाशिर्ष वाय-२, २२१५, (२२१५ १६४७)
(वेतनेत्तर) रत्नागिरी नगरपरिषद (जि. रत्नागिरी)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः मजीप्रा-२०१७/प्र.क्र.८३/पापु-२१
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक :- ८ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७

प्रस्तावना

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता विधीमंडळाने मंजूर केलेल्या अनुदानाच्या तरतूदीच्या अनुषंगाने नागरी भागातील पाणी पुरवठा कार्यक्रम, या योजनांतर्गत कार्यक्रमाखालील नागरी नळ पाणी पुरवठा योजनेतील नगरपालिका/नगरपरिषदांच्या पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान (२२१५ १६४७), या कार्यक्रमाकरीता, सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात रु. ३२,००,००,०००/- (रुपये बत्तीस कोटी फक्त) इतके अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करण्यात आले असून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर रु. २८,७९,८०,०००/- (रुपये अठ्ठावीस कोटी एकोणऐंशी लाख ऐंशी हजार फक्त) एवढे अनुदान उपरोक्त नमूद क्रमांक १ च्या शासन परिपत्रकान्वये वित्त विभागाकडून वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. आता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर रु.२२,५७,३९,८०४/- (रुपये बावीस कोटी सत्तावन लाख एकोणचाळीस हजार आठशे चार फक्त) एवढे अनुदान वितरणासाठी शिल्लक आहे.

२. सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर असलेल्या उपरोक्त नमूद अर्थसंकल्पीय अनुदानापैकी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या रु.२२,५७,३९,८०४/- (रुपये बावीस कोटी सत्तावन लाख एकोणचाळीस हजार आठशे चार फक्त) एवढया अनुदानातून रु. ७८,८०,३८६/- (रुपये अठ्ठयात्तर लाख ऐंशी हजार तीनशे शहाऐंशी फक्त) एवढे अनुदान संचालक , पाणी व स्वच्छता

सहाय्य संस्था, बेलापूर नवी मुंबई यांना मुक्त व वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय

राज्यातील नागरी क्षेत्रातील नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान, या कार्यक्रमाखालील महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान योजनांचे कार्यान्वयन पाणी व स्वच्छता सहाय संस्था यांचेकडून करण्यात येते.

२. सदर नागरी पाणी पुरवठा योजनांच्या कार्यान्वयनाकरीता सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात, **मागणी क्रमांक वाय-२, २२१५, १९२, नगरपालिका/नगरपरिषदांना सहाय्य (०२) राज्य योजना-(०२) (०२) नगरपालिका /नगरपरिषदांच्या पाणीपुरवठा व जलनि:सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान, लेखाशिर्ष २२१५ १६४७, ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)** या कार्यक्रमाखाली मंजूर असलेल्या रुपये ३२,००,००,०००/- (रुपये बत्तीस कोटी फक्त) इतक्या अर्थसंकल्पीय अनुदानापैकी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरणासाठी उपलब्ध असलेल्या उर्वरीत रु. २२,५७,३९,८०४/- (रुपये बावीस कोटी सत्तावन लाख एकोणचाळीस हजार आठशे चार फक्त) एवढया अनुदानातून रु. ७८,८०,३८६/- (रुपये अठ्ठयात्तर लाख ऐंशी हजार तीनशे शहाऐंशी फक्त) एवढे अनुदान संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांना या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून सशर्त मुक्त व वितरीत करण्यात येत आहे. या वितरीत व मुक्त तरतुदीचे वाटप सोबतच्या विवरणपत्र-ब मध्ये दर्शविण्यात आले आहे.

- सदर अनुदानाच्या रकमेचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत. शासनाच्या निदेशानुसार सदर अनुदान नागरी संस्थांना वितरीत करण्यात यावे.
- अनुदानाची रक्कम ज्याकरीता मंजूर व मुक्त करण्यात आली आहे, त्या विनिर्दिष्ट प्रयोजनाकरीताच दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत खर्च करावी.
- या मुक्त अनुदानातून होणा-या वाटपाची माहिती पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने शासनाला कळवावी.
- सदर अनुदानातून पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने सदर योजनांकरिता केलेल्या खर्चाचे लेखे तपासणीचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर यांना किंवा खास अधिकार दिलेला या विभागातील अधिकारी यांना देण्यात येत आहेत. याबाबत संबंधित कागदपत्रे, महालेखापाल किंवा खास अधिकार दिलेला विभागातील अधिकारी यांनी मागणी केल्यास पाणी व स्वच्छता सहाय संस्थेने त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावीत.

- मुंबई वित्तिय नियम, १९५९ मधील जोडपत्र-२ मधील नियम क्रमांक ३ अनुसार महालेखापालांच्या मागणीनुसार प्राधिकरणाचे लेखे संबंधित कागदपत्रांसह निरीक्षणाकरिता, पाणी व स्वच्छता सहाय संस्थेने महालेखापालांना सादर करावेत.
- पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेला शासनाकडून जी अनुदाने प्राप्त झालेली आहेत किंवा जी अनुदाने यापुढील कालावधीत प्राप्त होतील त्या अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने द्यावयाची आहेत. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था यांनी उपयोगिता प्रमाणपत्रात दर्शविलेल्या मंजूर व मुक्त अनुदानाच्या व खर्चाच्या कार्यक्रमनिहाय रकमा प्रमाणित करुन स्वाक्षरीत कराव्यात. त्या उपयोगिता प्रमाणपत्रावर उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी प्रतिस्वाक्षरी करावी ,अशी प्रमाणपत्रे शासनाला स्विकारार्ह होतील.
- सदर अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमुन्यात शासनाला सादर करावे तसेच उपयोगिता प्रमाणपत्राच्या प्रती महालेखापालांनाही पाठवाव्यात.
- सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा आणि विहित अहवाल विहित दिनांकास, लेखा अधिकारी, पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१ यांच्याकडे सादर करावा.
- या शासन निर्णयान्वये संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना मुक्त करण्यात आलेला निधी संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. हा निधी उपकोषागार कार्यालय, कोकणभवन, नवी मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. सतीश उमरीकर, संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. य. टे. पाडवी, उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी तथा संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांनी या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेली रक्कम उपकोषागार कार्यालय, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयातून आहरित करुन सदर रक्कम ही एनईएफटी (NEFT) प्रणालीद्वारे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या खाती जमा करण्यात यावी.

३. या वितरीत केलेल्या अनुदानातून होणारा खर्च, मागणी क्रमांक वाय-२, २२१५, १९२, नगरपालिका/नगरपरिषदांना सहाय्य (०२) राज्य योजना- (०२)(०२) नगरपालिका/नगरपरिषदांच्या पाणीपुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान, २२१५ १६४७, ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर तरतूदीतून भागवावा.

४. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७, मधील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी तसेच परिशिष्टातील अ.क्र. ३ व ८ मधील प्रत्येक अटींची पूर्तता झालेली आहे.

५. सदर शासन निर्णय हा वित्तीय अधिकार नियम पुस्तीका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-तीन, अ.क्र.५, परिच्छेद क्र. २७ (२) अन्वये विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१७११०८१५३५४४८६२८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Vijay Nikale

Digitally signed by Sudhir Vijay Nikale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bad5b254e42b3c3f9faf360aa0ac7a716f0d923d21cc4ef7c82851395c2c9a88, serialNumber=9ba935b376f098128ad16cbc9ef5abadabfd1ac32668cabb4d9b0072eddcbcd0, cn=Sudhir Vijay Nikale
Date: 2017.11.09 11:45:11 +05'30'

(सु.वि. निकाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

- मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
- अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
- महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) ओल्ड सी .जी .ओ . इमारत, न्यू मरीन लाईन्स, १०१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२०.
- महालेखापाल, महाराष्ट्र -२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) भारतीय लेखा व लेखापरीक्षा विभाग कार्यालय, सिव्हिल लाईन्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर - ४४० ००१.
- नियंत्रक अधिकारी तथा उप सचिव, (पापु-२१ व पापु-२२)पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
- आहरण व संवितरण अधिकारी तथा संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ (५ प्रतीसह)

- जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
- मुख्याधिकारी, रत्नागिरी नगरपरिषद, जिल्हा रत्नागिरी.
- उप कोषागार अधिकारी, कोकणभवन, बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४ .
- वित्त विभाग, कार्यासन क्रमांक व्यय- ३, बीयुडी- १८, अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
- नियोजन विभाग, कार्यासन क्रमांक १४४३, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,कार्यासन क्रमांक पापु-०४,२० व २२ मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
- ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ६ वा मजला, विधानभवन, मुंबई ४०० ०३२.
- महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. (५ प्रतींसह)
- निवडनस्ती (पापु-२१)

शासन निर्णय क्रमांक -: मजीप्रा-२०१७/प्र.क्र.८३/पापु-२१, दिनांक -८ नोव्हेंबर, २०१७ सोबतचे विवरणपत्र.

विवरणपत्र-अ

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	आर्थिक लेखाशीर्ष	सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदान	अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध अनुदान	आतापर्यंत मुक्त केलेले अनुदान	या शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात आलेले लेखानुदान
१	२	३	४	५	६
१	मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता, १९२ नगरपालिका / नगरपरिषदांना सहाय्य (०२) -राज्य योजना-(०२) (०२) नगरपालिकांच्या/ नगरपरिषदांच्या पाणीपुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहायक अनुदान. (२२१५ १६४७) ३१, सहाय्यक अनुदान, (वेतनेतर)	३२,००,००,०००/-	२८,७९,८०,०००/-	६,२२,४०,१९६/-	७८,८०,३८६/-
एकूण		३२,००,००,०००/-	२८,७९,८०,०००/-	६,२२,४०,१९६/-	७८,८०,३८६/-

Sudhir Vijay Nikale

Digitally signed by Sudhir Vijay Nikale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bad5b254e42b3c3f9faf360aa0ac7a716f0d923d21cc4ef7c82851395c2c9a88, serialNumber=9ba935b376f098128ad16cbc9ef5abadabfd1ac32668cabb4d9b0072eddcbcd0, cn=Sudhir Vijay Nikale
Date: 2017.11.09 11:47:16 +05'30'

(सु.वि. निकाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक मजीप्रा-२०१७/प्र.क्र.८३ /पापु-२१, दिनांक-: ८ नोव्हेंबर, २०१७. सोबतचे विवरणपत्र

विवरणपत्र-ब

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	योजनेचे नांव	वितरीत करावयाचे अनुदान
१	रत्नागिरी नगरपरिषद, जि. रत्नागिरी	७८,८०,३८६/-
एकूण -१ नगरपरिषद		७८,८०,३८६/-

Sudhir Vijay Nikale

Digitally signed by Sudhir Vijay Nikale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bad5b254e42b3c3f9faf360aa0ac7a716f0d923d21cc4ef7c82851395c2c9a88, serialNumber=9ba935b376f098128ad16cbc9ef5abadabfd1ac32668cabb4d9b0072eddcbcd0, cn=Sudhir Vijay Nikale
Date: 2017.11.09 11:47:40 +05'30'

सु. वि. निकाळे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.